# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ५७ वा ❑ शनिवार दि.०५ एप्रिल २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## चित्रपट उद्योगाचे सिंह कालवश


– प्रा डॉ सुधीर अग्रवाल


**ज्योतिर्मय साहित्य**

रोटी, कपडा और मकान आणि क्रांती सारखे उत्कृष्ट चित्रपट देणारे ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी मुंबईत निधन झाले. पूरब और पश्चिम चित्रपटातील भारत का रहने वाला हूं, भारत की बात सुनाता हूं... हे गाणे आजही सर्वांच्याच ओठावर आहे. दो बदन, हरियाली और रास्ता आणि गुमनाम सारख्या हिट चित्रपटांसाठीही ते ओळखले जात होते. मनोज कुमार या चित्रपटांसाठी प्रसिद्ध आहेत.

१९५७ मध्ये मनोज कुमार यांना त्यांचा पहिला चित्रपट फॅशन मिळाला, ज्यामध्ये १९ वर्षीय अभिनेत्याने ८०-९० वर्षांच्या भिकाऱ्याची छोटी भूमिका साकारली होती. मनोज कुमार यांनी सहारा (१९५८), चांद (१९५९) आणि हनीमून (१९६०) सारख्या चित्रपटांमध्ये काम केले आणि त्यानंतर त्यांना कांच की गुडिया (१९६१) मिळाला ज्यामध्ये ते पहिल्यांदाच मुख्य भूमिकेत दिसले. यानंतर पिया मिलन की आस (१९६१), सुहाग सिंदूर (१९६१), रेश्मी रुमाल (१९६१).

देशभक्तीपर चित्रपटांसाठी त्यांना भारत कुमार म्हणूनही ओळखले जात असे. कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. या बातमीनंतर संपूर्ण देशात शोककळा पसरली आहे. त्यांचे अंतिम संस्कार दुपारी जुहू येथील विशाल टॉवर येथे केले जाऊ शकतात. त्यांचे अंतिम संस्कार सकाळी जुहू येथील पवन हंस स्मशानभूमीत केले जातील.

मनोज कुमार यांचे भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदान नेहमीच लक्षात राहील. त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यांच्या नावावर वेगवेगळ्या श्रेणींमध्ये एक राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि सात फिल्मफेअर पुरस्कार आहेत. भारतीय कलेत त्यांच्या अमूल्य योगदानाची दखल घेत सरकारने त्यांना १९९२ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. २०१५ मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

लाल बहादूर शास्त्री यांच्या विनंतीवरून उपकार हा चित्रपट बनविला. १९६५ मध्ये, मनोज कुमार हे देशभक्तीपर शहीद चित्रपटात स्वातंत्र्यसैनिक शहीद भगतसिंग यांच्या भूमिकेत दिसले. हा चित्रपट खूप गाजला आणि त्यातील ए वतन, ए वतन हमको तेरी कसम, सरफरोशी की तमन्ना आणि मेरा रंग दे बसंती चोला या गाण्यांना चांगलीच पसंती मिळाली.

लाल बहादूर शास्त्रींना हा चित्रपट खूप आवडला. शास्त्रीजींनी जय जवान, जय किसानचा नारा दिला. शास्त्रीजींनी मनोजला या घोषणेवर चित्रपट बनवण्याचा सल्ला दिला. त्यानंतर मनोजने उपकार (१९६७) हा चित्रपट बनवण्यास सुरुवात केली, जरी त्याला चित्रपट लेखन किंवा दिग्दर्शनाचा कोणताही अनुभव नव्हता.

एके दिवशी मनोज कुमारने मुंबईहून दिल्लीला जाणाऱ्या राजधानी ट्रेनचे तिकीट काढले आणि ट्रेनमध्ये चढला. त्याने अर्धे चित्रपट ट्रेनमध्ये बसून लिहिले आणि उरलेले अर्धे परतताना लिहिले. या चित्रपटाद्वारे त्यांनी दिग्दर्शक म्हणून त्यांच्या कारकिर्दीची दुसरी इनिंग सुरू केली. पुढे त्यांनी पूर्वा और पश्चिम, रोटी कपडा और मकान यांसारखे देशभक्तीवर अनेक चित्रपट केले.

मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल चित्रपट निर्माते अशोक पंडित म्हणाले, ... महान दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते, आमचे प्रेरणास्थान आणि भारतीय चित्रपट उद्योगाचे सिंह मनोज कुमार जी आता आपल्यात नाहीत. चित्रपट उद्योगासाठी हे खूप मोठे नुकसान आहे आणि संपूर्ण चित्रपट उद्योगाला त्यांची उणीव भासेल.

# विनोद कुमार शुक्ला यंदाचे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते

**ज्योतिर्मय साहित्य**

**विनोदकुमार शुक्ल आज ८८ व्या वयातही आपल्या लेखनसाधनेत व्यस्त आहेत. सन १९७१ ला सुरू झालेली त्यांची सृजन यात्रा गेली ५५ वर्षे अव्याहतपणे कार्यरत आहे. साध्या घरात ते अत्यंत साधेपणाने राहतात. साधेपणातलं सौंदर्य जसं साहित्यात आहे, तसं त्यांच्या जीवनात आढळून येते. आचार-विचारांचं एकत्व म्हणजे त्यांचं जीवन. 'सामान्यांचा स्वर' ही त्यांच्या लेखनाची खरी ओळख आहे. साहित्यातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार नुकताच त्यांना जाहीर झाला आहे. त्यानिमित्ताने...**





ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विनोदकुमार शुक्ल यांचं हिंदी साहित्यात पदार्पण झालं ते कवी म्हणून. तो काळ होता १९६० च्या दरम्यानचा. हिंदी कवी श्रीकांत वर्मा त्यावेळी 'कृति' नावाचे एक नियतकालिक दिल्लीतून प्रकाशित करत होते. विनोदकुमार यांनी आपल्या काही कविता त्यांना प्रकाशनार्थ पाठवल्या. त्यापैकी आठ कविता 'कृति'मध्ये प्रकाशित झाल्या. त्यामुळे लौकिक अर्थाने विनोदकुमार कवी म्हणून प्रकाशात आले. विशेष म्हणजे प्रसिद्ध कवी गजानन माधव मुक्तिबोध यांना या कविता विशेष आवडल्या होत्या. म्हणून त्या त्यांनी श्रीकांत वर्मांना आपल्या शिफारशीसह पाठवल्या होत्या. त्यावेळी मुक्तिबोध आणि शुक्ल दोघेही राजानंदगाव (मध्य प्रदेश) मध्ये राहात असत. विनोदकुमार शुक्ल जबलपूरच्या कृषी महाविद्यालयात शिकत होते. कृषी पदवीधर होऊन ते मध्य प्रदेश सरकारच्या शेती विभागात कृषी विस्तार अधिकारी म्हणून रुजू झाले. नंतर कृषी महाविद्यालयात प्राध्यापक झाले. पदोन्नतीने पुढे कृषी विद्यापीठात त्यांनी अध्यापन केले व तिथून सेवानिवृत्त झाले. ते भारतीय साहित्य अकादमी पुरस्कृत कथाकार, कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. साहित्य अकादमीने त्यांना 'महत्तर सदस्यत्व' (फेलोशिप) बहाल करून सन्मानित केलं आहे.

विनोदकुमार शुक्ल यांचा पहिला काव्यसंग्रह 'लगभग जयहिंद' सन १९७१ मध्ये प्रकाशित झाला. अशोक वाजपेयी त्यावेळी आपल्या 'पहचान सक्रिज'मार्फत नवोदित हिंदी कवींचे काव्यसंग्रह प्रकाशित करीत होते. त्यांनीच विनोदकुमार यांना कादंबरी लेखनार्थ शिष्यवृत्ती दिली होती. त्यातून 'नौकर की कमीज' (१९७९) ही कादंबरी जन्माला आली. विनोदकुमार शुक्ल यांचे आजवर अनेक काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'वह आदमी चला गया नया कोट पहिन कर विचार की तरह' (१९८१), 'सब कुछ होना बचा रहेगा' (१९९२), 'अतिरिक्त नहीं (२०००), 'आकाश धरती को खटखटाता है' (२००६), 'एक पूर्व में बहुत से पूर्व' (२०२४) यांसारखे अनेक काव्यसंग्रह प्रकाशित असून त्यातील कविता वाचकांच्या हृदयाचा ठाव घेतात.

'लगभग जयहिंद' काव्यसंग्रहाची शीर्षक कविता एका सामान्य माणसाचं जीवन संविधान आहे. यात राजानंदगावचा ब्राह्मणपारा, तिथली कचेरी (सरकारी कार्यालय), न्यायालय, कृष्णा टॉकीज, डाक बंगला (सर्किट हाऊस), बनिया पारा यांचं चित्रण आहे. तिथली माणसं, जगणं कवी चित्रित करतो.

हूबहू रोबदार आदमी हो गया
लेकिन मैं अपने बाप की तरह नहीं था
मैं अपने दोस्त की तरह नहीं था
मैं संविधान भूल गया था!

म्हणत हा कवी आपलं चरित्र चित्रित करतो. माणसं मोठी होतात, शिक्षित होतात, स्वतंत्र होतात. पण देशाशी त्यांचं देणं-घेणं नसतं. आपण इतरांपेक्षा वेगळे या अहंकारात जगणारा मध्यम वर्ग गरिबीतून वर येतो. पण गरिबांचा राहात नाही, हे या कवितेतून विनोदकुमार शुक्ल यांनी चित्रित केलं आहे. प्रारंभापासूनच त्यांची कविता वास्तववादी परंतु व्यंगप्रधान शैलीची असल्याचे लक्षात येते.

'वह आदमी चला गया नया गरम कोट पहिनकर विचार की तरह' काव्यसंग्रहातील शीर्षस्थ कविता ही अशीच आहे. कवी दोन प्रकारचे असतात. एक पक्ष्यासारखा आकाशात भरारी घेत सारा आसमंत कवेत घेणारा. दुसरा असतो फुलपाखरांसारखा. तो पृथ्वीला धरूनच छोट्या छोट्या उड्या मारत जगत असतो. विनोदकुमार शुक्ल कवी म्हणून फुलपाखरासारखे जमीन वास्तवाशी नातं सांगत जगतात. या कवितेतली माणसं खरी स्लीपर्स वापरत जगतात हे रुपक फार बोलकं आहे. ज्यांनी स्लीपर घालून आयुष्य काढलं, त्यांनाच स्लीपर्सचे पट्टेही महाग असतात, हे माहिती असतं. घोडा त्याचं स्वप्न असतं. पण तो कधीच घोड्यावर बसू शकत नाही, अगदी नवरदेव बनून क्षणापुरती सवारीही तो करू शकत नाही. घोड्यासारखंच कोट घालण्याचं त्याचं स्वप्न अनेक हिवाळे ओसरले तरी स्वप्न बनून (खयाली पुलाव!) राहते. त्यांच्या 'सब कुछ होना बचा रहेगा' काव्यसंग्रहात 'मनुष्य मैं ही हूँ' कविता आहे. त्यात कवी आदिम माणसाची अनुभूती चित्रीत करतो. माणूस ज्या निसर्गात वाढतो तो यात आहे. माणसाच्या जगण्याच्या इतिहास आणि भूगोलाची ही कविता भूतकाळाकडून वर्तमानाकडे विकसित होणार्या मानव समाजाचं सूचक चित्र आहे.

चारों तरफ प्रकृति और प्रकृति की ध्वनियाँ है
यदि मैंने कुछ कहा
तो अपनी भाषा नहीं कहूँगा
मनुष्य ध्वनि कहूँगा !

म्हणणारा हा कवी आपली कविता म्हणजे समस्त मानव समाजाचंच महाकाव्य असल्याचं सांगतो.

'अतिरिक्त नहीं' काव्यसंग्रहात कवी विनोदकुमार शुक्ल यांनी मानवी जीवनातील विषमतेकडे आपलं लक्ष वेधलं आहे आणि जीवनात समाजवाद अवतरायचा असेल तर समानता असलीच पाहिजे, हे जोर देऊन सांगितले आहे... खरे सांगायचं तर बजावलंच आहे. कवी म्हणतो,

बाजार में जो दिख रही है
तंदूर में बनती हुई रोटी
सब के हिस्से में बनती हुई रोटी नहीं है
जो सब की घडी में बज रहा है
वह सब के हिस्से का समय नही हैं...

गरीब माणूस ज्वारी, बाजरी, मक्याची भाकरी खातो. तंदूर रोटी हॉटेलात जेवणारे खातात. भाकरी पण समान नाही आणि विकासाचा वेळ, संधी पण समान नाही. कार्ल मार्क्सला अभिप्रेत साम्यवाद अजून पृथ्वीवर खर्या अर्थाने अवतरला नाही, हे सत्य कवी विनोदकुमार शुक्ल या ओळींमधून नेमकेपणाने लक्षात आणून देतात.

अगदी अलीकडे प्रकाशित त्यांच्या 'एक पूर्व में बहूत से पूर्व'मध्ये हा कवी माणूस एकटा पडत जाणारी 'प्रजाती' बनला असल्याचं शल्य व्यक्त करतो.

'पेड पर कमरा' (१९८८), 'महाविद्यालय' (१९९६), 'एक कहानी' (२०२१), 'घोडा और अन्य कहानियाँ' या त्यांच्या कथासंग्रहातील पात्रे आपल्या आजूबाजूचीच असावीत अशी असतात. त्यांची 'रुपये' नावाची एक छोटी गोष्ट आहे. कथेचा नायक नोकरी करत असतो. तो काळ सन एकोणीसशेसाठ पूर्वीचा. नायकास पगार अवघा ९० रुपये मासिक. नायक शहरात. गावाकडच्या आई-वडिलांना तो पगार झाला की, ४० रुपये पाठवायचा. उरलेल्या ५० रुपयांत महागाईशी मुकाबला करत तो शहरात तग धरून जगायचा. एकदा पगारातील २० रुपयांची नोट कुठे ठेवली ती लक्षात न राहिल्याने त्याची होणारी तगमग या कथेत फार प्रभावीपणे चित्रीत केली आहे

'नौकर की कमीज' (१९७९) ही कादंबरी विनोदकुमार शुक्लांनी शिष्यवृत्तीतून लिहिली. तिचं पहिलं अभिवाचन अशोक वाजपेयी यांनी आपल्या मित्रांच्या उपस्थितीत भोपाळला घडवून आणलं होतं. मग 'खिलेगा तो देखेंगे' (१९९६) आली. सन १९९७ ला त्यांनी लिहिलेल्या 'दीवार में एक खिडकी रहती थी'ला १९९९ चा साहित्य अकादमी पुरस्कार लाभला नि त्यांना भारतीय साहित्यिक अशी ओळख मिळाली. आज त्यांच्या कथा, कादंबरी, कवितांची देशी-विदेशी भाषांतरं झालीत. त्यांना 'पेन-नाबोकोव पुरस्कार' मिळाला आहे. आता यावर्षीच्या भारतीय ज्ञानपीठ पुरस्काराने त्यांना सन्मानित केले जाणार असल्याची घोषणा म्हणजे त्यांच्या साहित्यिक श्रेष्ठत्वावर उठवली गेलेली मोहोरच होय.

नौकर की कमीज, खिलेगा तो देखेंगे, दीवार में एक खिडकी रहती थी या त्यांच्या कादंबर्या मराठीमध्ये निशिकांत ठकार यांनी अनुवादित केल्या आहेत; तर पेड में कमरा हा कथासंग्रह रमेश राऊत यांनी आणि अतिरिक्त नही हा कवितासंग्रह प्रफुल्ल शिलेदार यांनी अनुवादित केला आहे. विनोदकुमार शुक्ल आज वयाच्या ८८ व्या वर्षातही आपल्या लेखन साधनेत व्यस्त आहेत. सन १९७१ ला सुरू झालेली सृजन यात्रा गेली ५५ वर्षे अव्याहतपणे कार्यरत आहे. साध्या घरात ते अत्यंत साधेपणाने राहतात. सध्या ते छत्तीसगड राज्यातील रायपूरमध्ये राहतात. साधेपणातलं सौंदर्य जसं साहित्यात आहे, तसं जीवनातही. आचार-विचारांचं एकत्व म्हणजे त्यांचं जीवन. ते अत्यंत सजग, संवेदी, स्वाभिमानी साहित्यिक आहेत. त्यांना गृहित धरता येत नाही, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं खरं बलस्थान होय. ते कुठल्या गटा-गटात नसतात. रवींद्रनाथ टागोरांचा 'एकला चलो रे'चा मंत्र गुणगुणत ते मार्गक्रमण करत आहेत. ते स्वतःस सामान्यांचा प्रतिनिधी मानतात. 'सामान्यांचा स्वर' ही त्यांच्या लेखनाची खरी ओळख होऊन गेली आहे.

अंतर्मन के तालाब में बहिर्मुख के प्रतिबिंब को
अंतर्मुख देखता हूँ ! हे त्यांच्या समग्र साहित्याचं भरत वाक्य आहे.

## लक्षवेधी छायाचित्र....



ऊर्जेचे दोन स्रोत सोबत सोबत.....

(छाया : संजय दारमवार, मुंबई)

# करिअर कट्टा या उपक्रमात विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय पुणे विभागात व जिल्ह्यात प्रथम

**ज्योतिर्मय साहित्य**



महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मागील चार वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्रातील महाविद्यालयातील युवकांना करिअरची दिशा दाखवण्यासाठी करिअर कट्टा हा आगळावेगळा उपक्रम राबविला जातो. ज्या महाविद्यालयाने हे सर्व उपक्रम यशस्वीपणे राबविले त्यांना राज्याच्या माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या वतीने विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. मागील वर्षी करिअर कट्टा या उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अभ्यासेतर व अभ्यास पूरक उपक्रम राबविल्याबद्दल पुणे विभागीय महाविद्यालयांचा पुरस्कार वितरण सोहळा निगडी. पुणे येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे संपन्न झाला, त्यात बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने पुणे विभागात व जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. भरत शिंदे यांच्या वतीने करिअर कट्टाचे महाविद्यालय समन्वय डॉ. सुनील ओगले, जिल्हा समन्वयक डॉ. संजय खिलारे व डॉ. आनंदा गांगुर्डे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी दुबई सरकारचे टेक्निकल ॲडव्हायझर सोमनाथ पाटील ,आर्थिक विकास महामंडळाचे संचालक सचिन ईटकर, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट चे कार्यकारी संचालक डॉ. गिरीष देसाई व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे संचालक यशवंत शितोळे हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.शैलेंद्र देवळाणकर म्हणाले की , " आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ स्पर्धा परीक्षा ,नेट व सेट परीक्षा यावर विसंबून राहता येणार नाही. तर विद्यापीठांतर्गत प्रत्येक महाविद्यालयात कौशल्य प्रधान शिक्षण द्यावे लागणार आहे . पदवीच्या जोडीला आपल्या युवकाजवळ काहीतरी कौशल्य असल्याशिवाय त्यांना करिअरच्या दिशा गवसणार नाहीत. पुस्तकी ज्ञानासोबत व्यावहारिक ज्ञानाची युवा पिढीला खऱ्या अर्थाने गरज आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात करिअरच्या वाटा दाखविणाऱ्या कौशल्य शिक्षणाचा अंतर्भाव विद्यापीठीय अभ्यासक्रमात केलेला आहे. रुढ चाकोरी सोडून समाजाला ज्या कौशल्याची गरज आहे ते प्रशिक्षण आपण विद्यार्थ्यांना देणे गरजेचे आहे. उदा. प्लंबर, इलेक्ट्रिशियन, लॉन्ड्रीचालक केसकर्तनालय, वाहन चालक यासारख्या सेवांची आज गरज आहे. ही कौशल्ये आजच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्यास त्यांचे करिअर घडू शकते. पुढील पुरस्कार वितरणात अशा कौशल्य प्राप्त केलेल्या गरजू विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यास मला नक्की आवडेल. असा आशावाद महाराष्ट्र राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाकर यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे यांनी करिअर कट्टा वर्षभर राबवित असलेल्या दैनंदिन उपक्रमांची माहिती आपल्या प्रास्ताविकातून दिली. पुणे विभागातील जवळ-जवळ ७१ पुरस्कार वितरण याप्रसंगी झाले. डॉ.आनंदा गांगुर्डे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर जिल्हा समन्वयक डॉ. संजय खिलारे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. याप्रसंगी पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालयातील प्राचार्य प्रवर्तक, जिल्हा समन्वयक, तालुका समन्वयक व करिअर संसद मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .




– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com

आनंदी पहाट...

## संस्कृती संस्कारांवर आधारलेली असते

**ज्योतिर्मय साहित्य**

संस्कारांशिवाय जीवन भरकटलेल्या जहाजाप्रमाणे, विमानाप्रमाणे असते, एकप्रकारे विमनस्क अवस्थेतील मन कोणतीही पातळी गाठू शकते. आपली संस्कृतीसुद्धा संस्कारांवर आधारित असते. संस्कार म्हणजे आपल्या अंतर्मनावर सामाजिकदृष्ट्या महत्वाच्या आणि उपयुक्त ठरतील अशा चांगल्या सवयी, असे म्हणता येईल. आपल्यामध्ये यासाठी आवश्यक ते सद्गुण असणे जरुरीचे असते. अशा गुणांचा केवळ व्यक्तिगत लाभ होत नसतो, तर समाजातील प्रत्येक घटक लाभार्थी ठरत असतो. विचारांचा पाया मजबूत असलेल्या व्यक्तीच्या मानसिक कळसाची उंची मोजणे सहज शक्य होतेच असे नाही. अशा व्यक्तीपेक्षा त्या व्यक्तीच्या विचारांचेच आकर्षण, कौतुक आणि आदर अधिक असल्याचे दिसून येत असते. ह्याची जाणीव आपण ठेवणे आवश्यक असते. अशी वैचारिक प्रगल्भता प्राप्त करणाऱ्यांपैकी आपणही एक असायला काय हरकत आहे, असा विचार आपल्या मनात यायला हवा. विचारवंतांच्या वैचारिक बैठकीत सामील व्हायला कसे मिळेल, ह्याच दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येणे महत्वाचे ठरते. कारण, अशा विचारवंतांच्या वैचारिक, मानसिक कळसाला स्पर्श करून येणारा प्रकाशाचा, आशेचा प्रत्येक किरण मार्गस्थ होण्यासाठी अनेकांना योग्य दिशा दाखवत असतो. दशदिशांपैकी कोणत्याही दिशेने मार्गस्थ झाले, तरीही यश प्राप्तीच्या मार्गाचे दर्शन होतच राहते. आपल्या अंतर्मनाला संस्कारच शिस्त लावत असतात. एक विशीष्ट आकार, दिशा आणि गती प्राप्त करून देत असतात. मुळातच ह्या विचारांची व्याप्ती आपण समजून घेणे सर्वप्रथम जरुरीचे असते. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अंतर्मानावरील संस्कार खूप महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. त्याशिवाय आपल्या विचारांमध्ये परिपक्वता येतेच असे नाही. संस्काराशिवाय जीवनमूल्य शून्य ठरत असते. संस्कारच आपल्याला श्रेष्ठ बनवत असतात, उत्तम आकार देत असतात. आपल्या सर्वोत्तम जीवनाचा पाया उत्तम संस्कारांवरच अवलंबून असतो.

## अनोखे अंदमान – भाग १




**ज्योतिर्मय साहित्य**

अंदमान म्हणजे निसर्गाला पडलेलं एक सुंदर स्वप्न !अंदमान म्हणजे निसर्गानं भरभरून दिलेलं दान ! अंदमान म्हणजे क्रांतिकारकांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी. असं हे अनोखं अंदमान कधी एकदा बघायला मिळतं असं झालं होतं. लहानपणापासून अंदमानबद्दल ऐकत आणि वाचत आलो होतो. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, त्यांचे बंधू बाबाराव सावरकर आणि अन्य क्रांतिकारकांना अंदमानच्या भयानक काळ कोठडीमध्ये यातनांना तोंड देत काळ कंठावा लागला होता. अंदमानच्या भोवती सगळीकडे समुद्र. पाणीच पाणी चहूकडे ! अशा ठिकाणी ज्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली आहे असे कैदी पळून पळून जाणार तरी कुठे ? शिवाय भोवती घनदाट जंगल, वन्य श्वापदांची भीती ! सुटकेचा कोणताही मार्ग नाही. मातृभूमीपासून हजारो कोस दूर. एकदा शिक्षा झाली आणि अंदमानच्या तुरुंगात रवानगी केली की जिवंत परत जाण्याची शक्यता जवळपास संपलेलीच. म्हणून तर कदाचित इथल्या शिक्षेला काळ्यापाण्याची शिक्षा असे म्हणत असावेत.



पण प्रत्यक्षात इथे खरोखरच काळे पाणी आहे का ? छे छे !अंदमान सारखे सुंदर स्वच्छ समुद्रकिनारे, निळे अथांग पाणी, सुंदर आणि स्वच्छ आभाळ अन्य कुठे क्वचितच पाहायला मिळायचे ! इथला निसर्ग, हिरवीगार वनराई, खारफुटीची जंगले विविध प्रकारचे पक्षी आणि प्राणी या सगळ्या गोष्टींमुळे अंदमान खरोखरच अद्वितीय आणि अनोखे ठरते.

आपल्या देशाबद्दल माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची एक सुंदर कविता आहे. भारत जमीं का टुकडा नही, जीता जागता राष्ट्रपुरुष हैं. अंदमान बद्दल सुद्धा मला असेच म्हणावेसे वाटते. अंदमान केवळ जमिनीचा एक तुकडा नाही तर भारत वर्षाचे प्रतिनिधित्व करणारा एक जिवंत सळसळता भूभाग आहे. विविध जातीधर्मांचे लोक इथे एकत्रितपणे सुखाने नांदत आहेत. इथे आपल्याला भारताच्या संमिश्र संस्कृतीचे दर्शन घडते.

तसं प्रत्यक्षात भारताच्या भूमीपासून हजार बाराशे किलोमीटर दूर असलेलं हे ठिकाण भारताचा एक अविभाज्य भूभाग आहे. अंदमान आणि निकोबार बेटे हे केंद्रशासित प्रदेश आहेत. अंदमानला जाण्यासाठी केवळ दोनच पर्याय आपल्याला उपलब्ध असतात. पहिले म्हणजे विमानप्रवास किंवा सागरी मार्गाने जलप्रवास. अंदमानची राजधानी पोर्ट ब्लेअर ही हवाई मार्गाने तसेच जलमार्गाने आपल्या देशाशी जोडली गेली आहे. मुंबई, चेन्नई, कोलकाता, हैदराबाद आदी ठिकाणाहून आपण पोर्ट ब्लेअरला पोहोचू शकतो. जहाजाने पोर्ट ब्लेअरला पोहोचण्यासाठी दोन ते तीन दिवसांचा वेळ लागू शकतो. त्यामुळे तिथे जाण्यासाठी हवाई मार्गाने जाणे जास्त सोयीचे आहे. आपल्या वेळेनुसार आपण त्याचे नियोजन करू शकतो. आपल्या उपलब्ध वेळेप्रमाणे सहा किंवा सात दिवस त्यांचा अंदमान पाहण्यासाठी पुरेसे होतात. **(क्रमशः)**





उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## पढत मूर्ख लक्षण

**ज्योतिर्मय साहित्य**

स्वतः शहाणा म्हणवतो पण अथ पासून ईति पर्यंत ज्याचे वागणे मुर्खासारखे असते तो पढतमुर्ख. आपल्यात असलेले अवगुण ओळखून प्रयत्नाने ते दूर करावे. ज्याच्या जीवनात आचार विचार, ज्ञान, अज्ञान क्रिया ध्येय साधन यामध्ये समजून ऊमजून विरोध आढळतो तो पढतमुर्ख. जो पुष्कळ ग्रंथ वाचतो हुशार आहे वाणी व वचन योग्य आहे, पण वासना व अभिमान बाळगतो त्यामुळे तो पढतमुर्ख होय. ब्रम्हज्ञान मिळाल्यावर वाटेल यसे वागतो बंधनरहित आचरण सगुणाची भक्ती व्यर्थ आहे असे सांगत सुटतो स्वधर्माची व साधनाची निंदा करतो तो पढतमुर्ख होय. स्वतः खुप ज्ञानी आहे असा दंभाचाराचा डांगोरा पिटतो,सर्वांना नावे ठेवतो, लोकांचे दोष पहाण्यात चतुर असतो, ज्याच्या शब्दाने लोकांचे मन दुःखी कष्टी होईल असे वागतो, ज्याचे मन रजोगुण व तमोगुणांनी भरलेले आहे कपटी व दुष्ट अंतकर्णाचा आहे, श्रीमंत माणसाची खोटी स्तुती करतो, एखादा ग्रंथ पूर्ण होण्याआधीच त्याला नावे ठेवतो, कुणाचेही सद्गुण सांगावेत पण हा दुर्गुण सांगत बसतो, चांगल्या लक्षणाचा कंटाळा करून अवगुणांवर भरभरुन बोलतो, द्वेष मत्सराच्या पोटी अनेक ऊपदव्याप करतो. नितीन्यायाची चाड नसते. जो ऊध्दट असतो मीच काय तो मोठा जज्ञानी आहे अशा गर्वाने रहातो, घमेडखोर स्वभावामुळे भलतीच आकांक्षा धरतो, ज्याला संताप अनावर होतो, जो बोलतो एक व करतो दुसरेच. अशा लक्षणांची माणसे पढतमुर्ख होय.

स्वतःची योग्यता नसताना वक्ता बनणे. कठोर वाणी असणे, समोरच्याला कमी लेखणे, जो दुसऱ्याचे दोष शोधून सतत नावे ठेवतो, पण हे दोष आपल्यातही आहेत. हे हेतू पुर्वक विसरतो. जो दुसऱ्याचे समाधान करू शकत नाहीत. कामवासनेत, पैसा, लौकिक यांच्या आधीन होऊन जो भगवंताला विसरतो. तो पढतमुर्ख होय.

## कोणत्याही परिस्थितीत नामस्मरण शक्य आहे !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

मनुष्याची सर्व धडपड शाश्वत समाधान मिळविण्यासाठी चालू असते. ते समाधान फक्त भगवंताजवळ असल्याने समाधानासाठी प्रत्येक माणसाला भगवंताची गरज आहे. आपल्या सर्व धडपडीतून भगवंताच्या प्राप्तीचे समाधान आपल्याला मिळत नाही; आणि त्याला परिस्थिती कारणीभूत आहे, असे सर्वजण सांगतात. पण खरोखरच परिस्थिती आड येते किंवा काय हे आपण बघितले पाहिजे. परिस्थितीसंबंधी विचार करताना एक बाह्य परिस्थिती आणि दुसरी आंतर-स्थिती यांचा विचार करावा लागेल. बाह्य परिस्थितीचा विचार करताना प्रथम आपली शरीरप्रकृती आड येते. ही प्रकृती कशीही असली तरी भगवंताचे स्मरण आपल्याला करता येईल की नाही ? प्रकृतीला कितीही क्षीणत्व आले, देहाला कितीही विकलता आली, तरी अंतकाळी भगवंताचे स्मरण करता येते, असे भगवंताने गीतेत सांगितले आहे. देहाची अवस्था कोणतीही असली, तरी त्यामध्ये नामस्मरण करता येत नाही हे म्हणणे काही बरोबर नाही. तेव्हा, प्रकृती आड येते असे म्हणणे कितपत संयुक्तिक ठरेल ?

पुष्कळ लोक आर्थिक अडचणींसंबंधी कुरकूर करतात. पैसा नसल्याकारणाने प्रपंचात काळजी उत्पन्न होऊन भगवंताकडे लक्ष द्यायला सवडच मिळत नाही असे बरेचजण सांगतात. पण खरोखर तुम्ही मला सांगा, जगात भरपूर धन मिळवून वैभवाच्या शिखरावर पोहोचलेले कितीसे लोक नामस्मरण करतात ? आजपर्यंत किती राजे लोक आपले राजवैभव लाथाडून भगवंताच्या प्राप्तीसाठी बैरागी झाले ? आपल्याजवळ पैसा नसणे हे भगवंताच्या प्राप्तीच्या आड येते हे म्हणणे बरोबर नाही. उलट पैसा हा भगवंताची निष्ठा फार कमी करतो. पैसा असला की आपल्याला एक आधार आहे असे वाटते. म्हातारपणी आपल्याला उपयोगी पडावा म्हणून पैसा साठवायचा प्रयत्न करावा, तर मी म्हातारपणापर्यंत जगेन याची खात्री कोणी द्यावी ? सुख, समाधान हे पैशावर अवलंबून नाही. प्रत्येकाची गोतावळी ठरलेली आहे. वेताळाची स्वारी निघाली की त्याच्याबरोबर पिशाच्चे निघायचीच; आणि भगवंताची स्वारी निघाली की त्याच्याबरोबर दया, क्षमा आणि जिकडेतिकडे आनंदी वृत्ती ही असायचीच. त्याचप्रमाणे पैसा आला की त्याच्याबरोबर तळमळ, लोभ, असमाधान ही यायचीच. परस्त्री एखादे वेळी विषयभोगामध्ये आपल्याला सामील होणार नाही, पण पैसा मात्र आपण वापरू तसा वापरला जातो. बाप-मुलगा, भाऊ-भाऊ, भाऊ-बहीण, मित्र-मित्र यांच्यामध्ये वितुष्ट आणायला कारण काही असेल तर पैसाच होय.

आपण पैसा साठविला तर गैर नाही, पण त्याचा आधार न वाटावा. अनुसंधानाच्या आड त्याला येऊ देऊ नये.

***







विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७

## गोष्टी प्राण्यांच्या ४

**ज्योतिर्मय साहित्य**

उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले की, बालपणीचे दिवस आठवतात. माझे बालपण ज्या गावात आनंदी व संस्मरणीय झाले, ते गाव त्यावेळी खूपच निसर्गाच्या सानिध्यात होते. त्यामुळे भौतिक सुविधा फारच अल्प होत्या. म्हणजे अगदी गरज भागेल एवढ्याच होत्या. पण त्यामुळे निसर्गाचे प्रेम, शक्ती, आनंद भरपूर मिळाला. ते गाव डोंगरांनी वेढलेले होते. पुण्यातून तिकडे जायचे म्हंटले तर ३/४ तास एसटीचा प्रवास करावा लागायचा. अंतर होते फक्त २१ किलोमीटर.

या निसर्ग सानिध्यात अनेक प्रकारचे प्राणी अगदी जवळून बघितले. आम्ही रहात होतो त्या घराच्या खिडकीतून रोज जवळच्या झऱ्यावर पाणी प्यायला येणाऱ्या वाघाच्या दर्शनाने पहाट व्हायची. तर त्या भागात वाघ बऱ्यापैकी होते. त्यात एक वाघ फारच विचित्रपणे वागायचा. त्यामुळे त्याच्या बद्दल खूप दंतकथा ऐकायला मिळायच्या. या उन्हाळ्याच्या दिवसात बरेच प्राणी पाण्याच्या शोधात बाहेर पडतात. कधी कधी वणवा लागतो. आणि प्राणी गावात शिरतात.

या दिवसात तेथील सरकारी हॉस्पिटलमध्ये या वेगळ्या वाघाने त्रास दिलेल्या महिला दाखल व्हायच्या आणि त्यांना बघण्यासाठी आम्ही आपापल्या आई बरोबर जात असू. त्या महिला वर्णन करून सांगायच्या. त्या सांगायच्या, ''तो अर्धा माणसा सारखा व अर्धा वाघा सारखा दिसतो''. विशेष म्हणजे एकाच अंगणात किंवा झोपडीत कितीही माणसे झोपलेली असतील तरी तो वाघ आपल्या पंजाने स्त्रियांच्या कपाळावर डोक्यापर्यंत जखम करायचा. पुरुषांना काहीच करत नसायचा. आणि आठ वर्षाच्या आतील मुले पळवून न्यायचा. अगदी आईच्या मांडीवर असलेले बाळ सुद्धा ओढून न्यायचा. बरेचवेळा बाळाला वाचवण्याचा नादात आईच्या हातात फक्त बाळाचे केस रहायचे आणि बाळ नेले जायचे. त्या वेळी खूप वेळा माणसे मशाली, गॅसबत्त्या, कंदील, काठ्या घेऊन त्याचा पाठलाग करायची. पण तो जंगलात पळून जायचा. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच लोकांना त्या बाळाच्या अंगावरील कपडे, पायातले वाळे/पैंजण, करगोटा, गळ्यातील दोरा किंवा मणी अगदी काढून ठेवल्या प्रमाणे सापडायचे. या वाघाचा बंदोबस्त करण्याच्या नादात इतर वाघ मात्र मृत्यूमुखी पडले होते. आणि कित्येक जणांनी आपणच शिकार केल्याच्या थाटात फोटोग्राफर कडून फोटो मात्र काढून घेतले होते. मात्र तो मूळ वाघ काही सापडला नाही. कारण लगेच दुसऱ्याच दिवशी सरकारी हॉस्पिटलमध्ये नवीन जखमी एक दोन महिला दाखल व्हायच्या आणि त्याचे वर्णन सांगायच्या.

त्याच्या अनेक दंतकथा त्या वेळी ऐकायला मिळायच्या. एक दंतकथा फारच प्रचलित झाली होती. ती अशी होती. बंगाल मधील एक जादुगर आहे. त्याने वाघ कसे बनायचे ते शिकून घेतले होते. एकदा बायकोच्या हट्टामुळे तो वाघ बनला. आणि त्याला परत माणूस करण्याचा मंत्र बायकोने अर्धाच म्हंटला आणि ती घाबरून पळून गेली. म्हणून तो अर्धा वाघ व अर्धा माणूस आहे. आणि त्याचा महिलांवर राग आहे. म्हणून तो त्यांना कपाळावर ओरबाडतो. आणि मुलांना स्वतःबरोबर घेऊन जातो. या अशा दंतकथेमुळे आणि त्या दवाखान्यात दाखल झालेल्या लोकांच्या अनुभव कथनामुळे भीती व मनोरंजन असे वातावरण होऊन जायचे.

असेच काही अनुभव पुढील भागात वाचू.



नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**दुर्जनः परिहर्तव्यो विद्ययालङ्कृतोऽपि सन् ।**
**मणिना भूषितः सर्पः किमसौ न भयङ्करः ।।**

अर्थ – विद्येने अलंकृत असले, तरीही दुर्जनास जवळ ठेऊ नये. साप मण्याने आभूषित असला, म्हणून काय तो भयंकर नसतो का?

या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी दुर्जनसंगतीचा निषेध केला आहे. ज्या प्रमाणे मण्याने युक्त असलेला साप आपल्या मूळ विषारीपणाचा त्याग करीत नाही, त्या प्रमाणे विद्यावान जरी असला, तरीही दुर्जनाचा संग करू नये. दुर्जनसंगतीत मानहानिः पदे पदे। म्हणजे माणसाला पावलोपावली मानहानीस सामोरे जावे लागते.




**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या देशात चरित्र निर्मितीत हे वैशिष्ठ आहे त्यात ३ गोष्टी असतात

या देशातील चरित्रे सर्व पृथ्वीवरील मानवासाठी आदर्श आहेत.

१ चरित्र निर्मिती पूर्वी तिथे निर्मित साहित्य काय होते?

२ राजसत्तेचे माध्यम त्यावेळीची परिस्थीती चरित्र निर्मितीला कारणीभूत ठरते.

३ आधीच्या संताचे चरित्राचा प्रभाव असतो.

रामायण हे आदी काव्य आहे. त्यातून वाल्मिकीच्या हृदयातील शोक श्लोकाचा रूपाने प्रकट झाला, अनुष्टुभ छंद प्रकटला. रामाच्या जीवनातील गती म्हणजे रामायण. हे चरित्र ऐकताना आपण कुठे तरी आत्म मग्न व्हायला पाहिजे. सुख दुःखाची अंतःकरणात अधिकरण (एक दुःख गेले की मागून सुख येणार असते व सुख गेले की दुःख) हे चक्र चालू असते. जीव व सुख हे एका केंद्रात येत नाहीत. बैल गाडीच्या एका आरीवर सुख व विरुद्ध बाजूस दुःख असते एक वर तेंव्हा दुसरी खाली असते व हा फेरा सतत चालू असतो. म्हणून जीवनाचा गाडा चालतो.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

दुःखात सुखात मानसिक स्थिती ही पारमार्थिक असायला हवी. कफल्लक असून तुकाराम महाराज म्हणतात मी पूर्ण सुखी आहे, कारण त्यांची मानसिकता पारमार्थिक होती म्हणून.

शोक काळ आला असेल तर शोक करू नकोस व आनंदात उन्मत्त होऊ नकोस. संकट काळात भूतभवीश्याचा विचार न करता केवळ वर्तमानात जगा.

आमच्या जीवन धन्यतेचा विचार आपणास जागोजागी राम चरित्रात सापडतो म्हणून आम्ही हे चरित्र वाचावे, ऐकावे. भव हा रोग जुनाट आहे क्रॉनिक आहे म्हणून तो बरा होण्यास अवघड आहे. उपचारही दिर्घकाळ घेण्याची तयारी हवी.

क्रमशः




## हे पदार्थ दुधात मिसळल्यास होणारे फायदे

**ज्योतिर्मय साहित्य**

महत्त्वाचे म्हणजे ताण दूर करण्यास लिंबाच्या सालीची मदत होते. यात काही प्रमाणात फ्लेवानॉयड असते. त्यामुळे आपला ऑक्सीडेटिव्ह स्ट्रेस दूर होतो.

लिंबाच्या सेवनाने लिव्हर साफ होण्यास मदत होते. रक्ताभिसण चांगले होते.

लिंबाच्या रसा इतकीच लिंबाची साल देखील गुणकारी आहेत.....

पदार्थांची चव वाढवण्यासाठी जेवणात हमखास लिंबाचा वापर होतो. हे संत्री आणि मोसंबी प्रमाणे एक साइट्रस फळ आहे. नेहमी आपण लिंबाचा रस वापरतो आणि त्याची साल ही फेकुन देतो. मात्र, लिंबाच्या रसा इतकीच लिंबाची साल देखील गुणकारी आहेत. लिंबात बायोएक्टिव्हचे प्रमाण जास्त असते, जे आपल्या आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त आहेत. लिंबाच्या सालीत फायबर आणि क जीवनसत्त मोठ्या प्रमाणात असते. एवढंच नाही तर, कॅल्शियम, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम देखील मोठ्या प्रमाणात असतात. एवढे जीवसत्व आहेत.

लिंबाच्या सालीचे अन्य फायदे

लिंबाच्या सालीचे सेवन केल्याने आपली रोगप्रतिकार शक्ती वाढते. संशोधनानुसार आपण जर रोज एक ते दोन ग्रॅम क जीवनसत्त्वाचे सेवन केले तर आपल्याला व्हायरल ताप आणि सर्दी होण्याची शक्यता ही ८ ट्क्क्यांन कमी होते.

अनेकदा जेवण्याच्या भांड्याला आतून चिवटपणा राहतो. साबणाने देखील हा चिवटपण जात नाही. एखादा पदार्थ करपला की भांड्याच्या तळाला डाग राहतात अशावेळी लिंबाच्या सालीने भांडी घासली की चिवटपणा लगेच निघून जातो.

कुकरमध्ये भात शिजवताना कुकर आतून काळा पडतो अशावेळी खाली पाण्यासोबत लिंबाची एक साल देखील ठेवावी, सालीमुळे कुकर आतून काळा होत नाही.

चहा किंवा कॉफी तयार करताना भांड्यावर येणार काळा थर काढण्यासाठी लिंबाच्या सालीचा वापर होऊ शकतो.

फ्रिजमध्ये जर दुर्गंध येत असेल तर दोन तीन लिंबाच्या साली ठेवाव्या, फ्रिजेमधी दुर्गंधी लगेच दूर होते.

घरात मुंग्या येत असतील तर त्या जिथून येतात तिथे लिंबाची साल ठेवावी, मुंग्या किंवा इतर छोट्या कीटकांचा त्रास कमी होतो

लिंबांच्या सालीचा वापर करून तुम्ही नखं स्वच्छ करू शकता. लिंबाची साल पाय किंवा हातांच्या बोटावर अलगद फिरवल्यास नखं तर स्वच्छ होतातच पण नखांवर एक वेगळीच चमक देखील येते.

ढोपर किंवा हाताचे कोपरे काळवंडले असतील तर त्या ठिकाणी लिंबाच्या सालीने मसाज केल्याच काळवंडलेली त्वचा उजळते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

***

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

अतिथी ही देखील रवींद्रनाथांची एक सुंदर कथा आहे. या कथेत मतिलाल नावाचे एक जमीनदार, त्यांची पत्नी अन्नपूर्णा, मुलगी चारूशी आणि कथेचा नायक असलेला एक मुलगा तारापद अशी प्रमुख पात्रे आहेत. तारापद हा पंधरा सोळा वर्षांचा एक ब्राह्मण मुलगा आहे. तो आपलं घर सोडून बाहेर पडला आहे. सहृदय असलेले मतीलाल बाबू बोटीतून आपल्या कठालिया या आपल्या गावी परतत असतात. बोटीवर त्यांच्यासोबत त्यांची पत्नी अन्नपूर्णा, आणि नऊ वर्षांची असलेली एक सुंदर मुलगी चारूशी आहे. तारापद त्यांच्याकडे येतो. त्याला नंदिग्रामला जायचे असते. मला नंदिग्रामला सोडाल का असे तो मतीलाल बाबूंना विचारतो. तारापद हा मुलगा देखणा आहे. त्याच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे तेज आहे. कोणत्याही व्यक्तीवर त्याच्या व्यक्तिमत्वाचा पाहता क्षणीच प्रभाव पडावा असा तो आहे. त्याच्याकडे पाहून मतीलाल त्याला ठेवून घेतात आणि नंदिग्रामला सोडण्याचे आश्वासन देतात.

तारापद म्हणजे स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा एक मनमौजी मुलगा. तो बोटीवरील सगळ्यांचीच मने जिंकून घेतो. त्याला संगीताची आवड आहे. त्याचा आवाज उत्तम आहे. त्याला स्वयंपाक करणे, खरेदी करणे इथपासून ते बोट चालवणे आदी कौशल्ये सहज जमतात. अन्नपूर्णा तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे एवढ्या आकर्षित होतात की त्याला पाहून त्यांच्यातील वात्सल्यभाव जागृत होतो. त्याला कसे खुश ठेवता येईल याचा प्रयत्न त्या करतात. त्या त्याला त्याचा भूतकाळ किंवा कौटुंबिक पार्श्वभूमी विचारतात पण त्याबद्दल तो फारसे बोलत नाही. त्याच्या आईला चार मुलगे आणि तीन मुली आहेत. तसा तो घरातही सगळ्यांचा लाडका असतो. पण एकाच ठिकाणी अडकून पडणे वा बंधनात राहणे हा त्याचा स्वभाव नाही. त्यामुळे तो दोन तीन वेळा घरातून पळून गेला आहे.

# प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रूजवणारा कलाकार

**ज्योतिर्मय साहित्य**

हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्वात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी रोजी झाला. मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी स्वामी असे होते. मनोज कुमार यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. दिलीप कुमार हे त्यांचे आवडते अभिनेते. त्यांच्यावर दिलीप कुमार यांचाच प्रभाव होता. त्यांनी मनोज कुमार हे नाव धारण करण्यामागेही दिलीप कुमार हेच होते. शबनम या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेल्या पात्राचे नाव मनोज कुमार असे होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेले मनोज कुमार हे पात्र त्यांना इतके भावले की त्यांनी स्वतःचे नाव मनोज कुमार असेच ठेवले. १९५७ साली शहीद या चित्रपटाद्वारे मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटात त्यांनी साकारलेली भगतसिंग यांची भूमिका प्रेक्षकांना खूप भावली. देशभक्तीवर आधारित हा चित्रपट यशस्वी झाल्याने त्यांनी पुढे अनेक



देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली. मनोज कुमार यांनी उपकार या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले. लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला जय जवान किसान... हा नारा त्यांनी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट खूप गाजला या चित्रपटातील गाणी लोकप्रिय झाली. मेरे देश की धरती.... हे अजरामर गीत याच चित्रपटातले. उपकार नंतर त्यांनी पुरब और पश्चिम, हरियाली और रास्ता, रोटी कपडा और मकान, क्रांती, हिमालय की गोद मे हे देशभक्तीपर चित्रपट काढले हे सर्व चित्रपट खूप गाजले. या चित्रपटाद्वारे त्यांनी प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. मनोज कुमार यांनी आणि अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली म्हणून त्यांना भारत कुमार हे टोपण नाव पडले. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले देशभक्तीवरील चित्रपट त्याकाळी खूप गाजले होते. मेरे देश की धरती, सरफरोशी की तमन्ना, एक प्यार का नगमा है, पाणी रे पाणी तेरा रंग कैसा अशी अनेक अजरामर गाणी मनोज कुमार यांच्यावर चित्रित झाली आहेत. आजही स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी त्यांच्या देशभक्तीवरील चित्रपटातील गाणी आवर्जून वाजवली जातात. शोर, पत्थर के सनम, दो बदन, मेरा नाम जोकर हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील खूप लोकप्रिय ठरले. मनोज कुमार यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. उपकार या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. २००५ साली त्यांना चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च असा दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाला. १९९२ साली भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. मनोज कुमार यांनी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारा पडद्यावरील भारत कुमार काळाच्या पडद्याआड गेला असे म्हणावे लागेल. मनोज कुमार यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली आहे. ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# रंग जीवनाचे...

**ज्योतिर्मय साहित्य**

दिवसाच्या प्रत्येक प्रहराप्रमाणे बदलणारे आकाश रंग, ऋतू रंग आपल्याला खूप काही देत असतात, शिकवत असतात. आपण केवळ शांतपणे विचारपूर्वक त्या रंगांचा स्वीकार करायचा असतो.कुठले रंग कुणाच्या जीवनात नियती कसे, कधी भरणार आहे हे आधीच ठरलेले असते.पण जे आपल्या ओंजळीत पडतात ते अधिक कसे खुलतील हे मात्र आपणच ठरवायचे.

पहाट प्रहराचा उगवतीचा गुलबट कोवळा रंग म्हणजे जणू आपल्या जीवनातील पहिली बाळ पाऊले. किती सुंदर असतात ती. त्याचा हळूहळू धरतीला स्पर्श होऊ लागतो. आसपासच्या वातावरणातील रंग उमगू लागतात आणि आपल्या जीवनातील रंगात भर पडत जाते. आकाशाच्या नितळ निळाई सारखी मनात कधीतरी शुभ्र कापसासारखी स्वप्ने तरंगतात. तर कधी काळा कृष्ण मेघ मन झाकोळून टाकतो. विजेच्या फटकाऱ्यासारखे नियती अचानक कधीतरी आसूड ओढते. खूपदा मग मनाच्या धारा झरतात. अचानक एखाद्या वळणावर त्या श्रावण धारांच्या संगतीत समजूतदार सोनेरी ऊन येते आणि मग क्षणात सप्तरंगी इंद्रधनुष्य फुलते. हे रंग, हे क्षण आपल्या मन कुपीत नेहमीच जपून ठेवावेत, कारण पुढच्या तप्त वळणावर त्याच क्षणांचा लालबुंद गुलमोहर फुलवता येतो. पिवळ्या बहाव्याचे झुंबर हलकेच एखाद्या वळणावर झुलते.



सौ.माधुरी म.इनामदार
मिरज

जीवन प्रवाह वहातच असतो.मध्येच एका वळणावर वसंत येतोच. अनेक रंग गंधात नटलेल्या उन्हाच्या झळा ही आपल्या सुंदर सहवासाने सुखद करणाऱ्या,मुलांचे जन्म, त्यांचा प्रेमळ सहवास म्हणजे जणू निसर्गातील हिरवाई. सदैव बहरलेली.ऋतू प्रमाणे कमी जास्त होते.पण ती आपल्याबरोबर नित्य असते. आपणही ती ओल, त्यातील ताजा हिरवेपणा सुकू नये याची काळजी मात्र घ्यायला हवी.

दिवसाचे प्रहर ढळत जातात आणि सामोरे येते ते सांध्य पर्व. केशर रंगात भिजलेले. निरोपाचे धागेही आपल्या सुंदर तरल रंगात पसरवत जाणारे. दूरवर दिसणारी हिरवाई आता गडद होत जाते.कातर छाया हलकेच उतरत असतात. या वेळी मनातील सांजेचा दिवा शांत तेववत ठेवावा लागतो.

आता पुढचे वळण सावळ्या रात्रीचे कधी पौर्णिमेच्या शितल चंद्रगंधाचे शिंपण करणारे.कधी गर्द काळ्या अमावस्येची दाट भीती दाखविणारे.अशा वेळी आपण मैत्रीचे नक्षत्र दिवे बघत वाटचाल करत राहायचे. कारण दूर असले तरी ते वाट नक्कीच दाखवितात.

जीवनातले हे सगळे रंग कमी जास्त प्रमाणात सर्वांना लाभतात. आपण ते फिकट होऊ नयेत किंवा पुसू नयेत एवढी काळजी मात्र नक्की घ्यायची. तसे केले तर आपण असलो नसलो तरी आपला आठवांचा अनोखा प्रसन्न रंग नेहमीच प्रत्येकाच्या मनात राहील.. हो ना?

(फोटो प्रकाश आमटे यांच्या पेजवरील अनिकेत आमटे यांनी काढलेला आहे.)





## जात्यावरच्या ओव्या......

---

**नातेसंबंध -मायलेकी**

लेक चालली नांदाया
माय हंबरती गाय
जवाई निखरट
मागे वळून न पाहे ||१३||

अशी नांद लेकी
नांदून कर नाव,
तुझ्या शिवाच्या शेजारी
मह्या सोयऱ्याचं गाव ||१४||

---

संदर्भ: कै. गवणाबाई बोराडे
संकलन: सौ मनोरमा बोराडे

# अनुभूति निरुपण – भावी पिढीला प्रेरणा देणारा संग्रह

**ज्योतिर्मय साहित्य**

ज्या महाराष्ट्राच्या मातीत आपण वाढलो, फुलली आणि आपल्या पंखांना बळ मिळाले. त्याच मातीला अनेक श्रेष्ठ संत साहित्याची परंपरा लाभली आहे . जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणारे ज्ञानेश्वर माऊली, नाठाळांच्या माथी काठी मारणारे संत तुकाराम, आई वडिलांची सेवा हीच विठ्ठलाची भक्ती मानणारा भक्त पुंडलिक, दळण–कांडण करून ओव्या गात विठ्ठलाची आळवणी करणारी जनाबाई, मुंगी होऊन आकाशी उडणारी संत मुक्ताबाई... अशी एक नाही, अनेक संताच्या पदस्पर्शाने ही भूमी पावन झाली आहे. संतांच्या विचार वारशाने लोकांच्या मनातील अविवेकाची काजळी अभंगाच्या माध्यमातून दूर करून समाजाला एका शाश्वत विचार प्रवाहाकडे घेऊन जाण्याचे काम, समाज प्रबोधनाचे काम या संत मंडळी कडून केले गेले आहे.

मेहकर जि. बुलढाणा येथील आमचे स्नेही प्रा.भगवान राईतकर सर यांचे ''अनुभूति निरूपण'' हे अध्यात्मिक पुस्तक वाचनात आले . परमपूज्य कर्मयोगी शुकदासजी महाराजांच्या लाभलेल्या प्रत्यक्ष अनुभवाच्या पातळ्यावरून हा ग्रंथ आकाराला आला आहे. प्रस्तुत पुस्तकात तेरा अभंगांचे निरूपण करण्यात आले आहे. अनुभूति या शब्दाचा अर्थच मुळी अनुभवाची पातळी असा होतो. परमपूज्य शुकदासजी महाराज यांच्या प्रत्यक्ष सहवासाने लेखक भगवान राईतकर यांचे जीवन घडले. अशा संतमंडळीचा सहवासाने चंदनरूपी सहवास सामान्य माणसाला लाभला असता सामान्य माणसाचे आयुष्यही चंदनासारखे सुवासिक होऊन जाते. तशाच पध्दतीने लेखकाच्या आयुष्याचे चंदन व्हायला संत शुकदासजी महाराजश्री यांच्या सहवासाची मदत झाली आहे.

मागणे एकचि देवा तुझ्यापाशी
मलिन मनासी, शुद्ध करी

परमार्थिक आणि सांसारिक पातळीवरचा विचार या अभंगातून मांडला आहे. जगाच्या कल्याणासाठी जसे संत ज्ञानेश्वरांनी पसायदान मागितले त्याप्रमाणे, या जगाच्या निर्मिकाकडे एकच मागणे संत शुकदासजी महाराजश्री यांनी केले आहे. सुखाच्या अपेक्षेने प्रत्येकजण परमेश्वराच्या पायाशी लीन होऊन काही ना काही मागणी करत असतो .ही मागणी कधी स्वहितासाठी असते तर कधी जगाच्या कल्याणासाठी असते. प्रस्तूत अभंगातून पूजनीय शुकदासजी महाराजांनी–मलिन मनाला शुद्ध करण्याची एकमेव मागणी केली आहे. माणसाच्या मनात अनेक प्रकारचे विकार भरलेले आहेत. राग, लोभ, माया, मत्सर, द्वेष यांनी मलिन झालेले मन शुद्ध करायचे असेल तर प्रत्यक्ष भगवंताला शरण जाऊन मनाची शुद्धी करून घ्यावी लागेल . विकारांपासूनू मनाला शुद्ध करावे लागेल .तेव्हाच खऱ्या परमार्थिक पातळीवर शुद्ध मन भगवंताच्या पायाशी लीन होऊ शकेल.

''शुकदास म्हणे, झोपाळू आळशी मुकतो सेवेसी कायमचा ।। ''

माणसाच्या सुखाच्या कल्पना खूप वेगवेगळ्या असतात, माणसाचे जीवन कष्टाने व्यापलेले असतांना त्यात सुखाची हिरवळ शोधण्याचा शोधण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू असतो. या शोधापायी माणूस स्वार्थी होत चाललेला दिसतो. आडमार्गाने येत चाललेला पैसा माणसाला कष्टापासून दूर घेऊन चालला आहे. झोप, आळस यांचा अंमल शरीरावर होऊ लागल्याने आपल्या कर्तव्याचा विसर पडला आहे .त्यामुळे कर्तव्य रूपी सेवा काय आहे हेच मानवाला कळेनासे झाले आळशीपणाच्या, व्याधीमुळे अनेक रोग जडत आहेत जन्माला आल्यानंतर आपल्या जीवनाचा अर्थ, खरे यशाचे गमक कष्टात आहे, हेच मानव विसरत आहे. परमपूज्य संत शुकदासजी महाराजश्री आपल्या एका अभंगात म्हणतात की,

'' उद्योगी माणूस सुखाने जगतो ।
नेहमी राहतो जानंदित ।।''

जीवनाच्या यशाची पायरी गाठताना कष्टाला पर्याय नाही, हाच विचार वरील अभंगातून अधोरेखित झाला आहे. झोपाळू, आळशी वृत्ती जीवनाचा सर्वनाश





करत असते .याउलट उद्योगी, माणसाचे जीवन सुखाने भारलेले असते. कष्टाच्या मनोऱ्यावर चढत जाऊन यशाला गवसणी घालता येते. उद्योगी माणसाची सुखाची व्याख्याच मुळात कष्ट आहे. कष्टामुळे माणसाला अपार सुखाची अनुभूती येते. शांत झोप लागणे हे एक प्रकारचे सुखच आहे. आणि कष्टाळू माणसाला दिवसभराच्या कष्टामुळे धरतीला पाठ टेकताच शांत झोप लागते. सुखाने जगव्याची गुरुकिल्ली कष्ट हेच आहे. आहे. यशोशिखरावर पोहोचायचे असेल तर कष्टाच्या पायऱ्या चढाव्याच लागतील. या पायऱ्या चढताना अनेक संकटाचा सामना करत पुढे जावे लागते. मनातील आशा,विश्वास अणि कष्टाच्या जोरावरच अनेक अवघड प्रसंगातून चालण्याची वाट सापडत असते . कष्टातून सुखाची हिरवळ प्राप्त करतांना परमपूज्य शुकदासजी महाराज म्हणतात की,

मोठेपण तसे, फुकट मिळेना।
तोड संकटांना द्यावे लागे

जया अंगी मोठेपण तया यातना कठीण असे म्हटले जाते .दगडालाही देवपण येण्यासाठी हातोडी छिन्नी यांचा मारा सहन करावा लागतो. सहज मिळणारा मोठेपणा हा तात्पुरता असतो. निरंतर मोठेपणा मिळवायचा असेल संकटाच्या भट्टीत तावून सुलाखून निघावे लागेल. अनेक संकटांना धैर्याने सामोरे जावे लागते . जगाच्या बाजारात खणखणतं नाणं व्हायचे असेल तर, नुसता आवाज करून चालणार नाही. त्यासाठी संकटांशी भिडावे लागते. ''असे जगावे आव्हानांचे लावून अत्तर'' म्हणत आयुष्यात सुगंधाची लयलूट करता यायला हवी .

एके ठिकाणी परमपूज्य संत शुकदासजी महाराज म्हणतात की,

वडाच्या झाडाला, झुडूप ठेवणे ।
त्याचे ते राहणे, शक्य नाही

**पुस्तक परीक्षण**

सरिता कलढोणे
(कवयित्री व लेखिका)
शिवजन्मभूमी, जुन्नर

जीवनात आयुष्यात अनेक स्पर्धांना सामोरे जावे लागते. त्यासाठी योग्य नियोजन आवश्यक असते. प्रत्येक पायरीवर जिद्द, चिकाटीने तयारी केली की यश हमखास मिळत असते. एखाद्या व्यक्तीने कष्टाने मिळवलेले यश पाहून इतरांचा जळफळाट होतो. अशा लोकांसाठी प्रस्तूत अभंगातून एखाद्या वृक्षाची तुलना एखाद्या सामान्य व्यक्तीशी केली आहे. जसे झाडाला आपली उंची मोजण्याची आवश्यकता नसते. तसेच फुलांनाही आपल्या सुगंधाचा ढोल वाजवावा लागत नाही. जे आंतरीक आहे ते बाहेर पडतच असते. एखाद्या वडाच्या झाडाला झुडुपासारखे ठेवणे अशक्य आहे. वड आपला विस्तार, शाखा वाढवित असतो. त्याच शप्रमाणे सामान्य माणूस इतरांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत आपली वाटचाल पुढे चालूच ठेवतो. अनेक दाखले आणि उदाहरणांच्या व्दारे परमपूज्य संत शुकदास महाराज यांनी जीवनाविषयीचे तत्वज्ञान विशद केले आहे. एके ठिकाणी ते म्हणतात की,

चित्त शुद्ध नाहीं ल मन ते चंचल
करी तू सांभाळ, देवा माझा

प्रस्तुत अभंग रचनेतून दैनंदिन जीवनात. व्यक्तींना आपल्याकडे असलेल्या दिखाऊपणा दाखवायचा किंवा मी किती श्रीमंतीत जीवन जगतो, याचा डामडौल करायचा असतो. एखादी व्यक्ती कितीही श्रीमंत असली पण, त्याचे आचरण योग्य नसेल तर, त्याच्याकडे असणा–या श्रीमंतीचा काहीच उपयोग नाही. संत तुकारामाच्या अभंगानुसार सांगायचे म्हटले तर, असे सांगता येईल ''नाही निर्मळ जीवन काय करील साबण'' चित्त शुद्ध करायचे असेल तर, त्यासाठी विचार आचार शुद्ध हवेत, जसे बोलले तसे वागायला हवे. बोलण्या वागण्यात एक वाक्यता असायला हवी. चंचल मनाला आवर घालून भगवंताच्या चरणी नतमस्तक व्हायला हवं . जीवनरूप नौका पार करण्यासाठी भगवंताशिवाय दुसरा मार्ग नाही.

सहज सोप्या अभंगाच्या माध्यमातून परमपूज्य संत शुकदासजी महाराजांच्या निवडक अभंगातून साकारलेले हे शब्दशिल्प भावी पिढीला प्रेरणादायक आहे आणि असेल यात काही शंका नाही. अनुभुति निरूपण या ग्रंथातून सहज, सोप्या शब्दाच्या अनुभुति वर्णन केली आहे. कवी, लेखक व साहित्य संपादक प्रा. भगवान राईतकर यांना पुढील लेखन वाटचालीस खूप खूप शुभेच्छा ...

# बाबागिरी...

ज्योतिर्मय साहित्य

आज तो लवकर उठला आणि ऑफिस साठी तयारी करायला लागला. आवरता आवरता बायकोला विचारले, तू पण आवरून ऑफिस मध्ये ये. तीने कशाला? असे विचारायच्या आत म्हणाला ऑफिस जवळ ते मोठे हॉटेल सुरु होत आहे, त्यासाठी मोठे बाबा येणार आहेत.माझा मित्र पक्याचे गुरु आहेत. त्याने सांगितले की त्यांना तूझ्या ऑफिस मध्ये पण घेऊन येतो. मी नको म्हणालो पण त्याने इतका आग्रह केला की त्यांच्या पद स्पर्शाने तुझा खूप फायदा होईल. ते कोणाकडे असे जात नाही पण मी सांगितले आणि त्यांनी होकार दिला आहे. ही सुवर्ण संधी तूझ्या भाग्यात आहे. बायको लगेचच ह म्हणाली आणि काय काय तयारी करावी लागेल याचे नियोजन सुरु केले. मग मित्राला फोन, त्याच्याबरोबर बाबांसाठी काय? वगैरे वगैरे...

ऑफिसच्या मुख्य दरवाजा पासून ते ऑफिस केबिन पर्यंत विविध रंगी रांगोळी, सनईचे मंद स्वर ऑफिस मध्ये. गुरुदेव आत मध्ये येत असतांना गुलाबाच्या पाकळ्या वरून केबिन पर्यंत,त्यांना सुवासिनी ओवाळणार आणि मग सर्वांना पंच पक्कानाचा अल्पसा नेवेद्य... तसे ऑफिस बंगल्यामध्येच होते. मागच्या बाजूला तिघे भाऊ एकत्र पण स्वतंत्र रहात होते. पुढच्या बाजूला नंतर काही ऑफिसेस काढले होते. दोघे भाऊ नोकरी करत होते.आणि हा व्यवसाय करत होता. पक्याचा फोन आला,आम्ही निघालो आहे कार्यक्रम संपला आहे आणि अगदी पाचच मिनिटे बाबा येणार आहेत. तयारी झाली आहे ना? त्याने ह झाली आहे या या!बायकोला सांगितले, ओवाळण्यासाठी सुवासिनी मुख्य दरवाजा जवळ. काही मोठ्या गाड्या, टू व्हीलर वरून भक्त मंडळी जयजयकार करत बाबांचे आगमन,पुष्प वर्षावात सर्वांचे स्वागत, भक्तिमय वातावरण...

**सतीश इंदापूरकर**

काही निवडक भक्त बाबांच्याबरोबर त्याच्या केबिन मध्ये. आदराने वाकून बाबांचा आशीर्वाद. बाबा अचानक पणे ध्यान मुद्रे मध्ये. भक्तांनी हात जोडून त्यांच्या ध्यानाचा आशीर्वाद मिळावा म्हणून किंवा भक्ती म्हणून पण!बाबांनी सर्वांना बाहेर जायला सांगितले. ते दोघेच केबिन मध्ये...

बाबा बोलू लागले, हळू आवाजात. मी आत प्रवेश करताच एक संदेश आला. म्हणून ध्यानात गेलो होतो. तो फक्त हात जोडून बसलेला.ही वास्तू शापित आहे. सुमारे २५ वर्षांपूर्वी तुमच्या बंगल्यात एका सुवासिनीचे प्रेत दोन दिवस पडले होते,नंतर ते कोठे गेले ते कळत नाही पण त्यामुळे ते या वास्तूचा विकास होणार नाही...

तो म्हणाला मी माझ्या लहानपणापासून येथेच राहतो. तसे काही झालेले नाही बाबा. आणि वास्तूचा विकास वगैरे असा विचार नाही, गरज पण नाही कोणाला... बाबांनी मित्राला बोलावले आणि तेच सांगितले...

मित्र म्हणाला बाबा म्हणतात म्हणजे ते बरोबरच...

बाबा म्हणतात...
यांना नीट समजावून सांगावे...
बाबा निघाले...
भक्तांचा जयजयकार सुरु झाला...

दोनतीन दिवसांनी पक्या ऑफिस मध्ये. अरे बाबा खूप सिद्ध पुरुष आहेत. ते जे म्हणाले त्यात नक्कीच तथ्य असणार. तू विचार कर!तो फक्त ह म्हणाला आणि मनात एक शंका कुजबूजली. संध्याकाळी तिघे भाऊ एकत्र. त्याने झालेला प्रकार सांगितला. तिघांनी एकमताने ठरवले, तसे आधीच ठरवले होते की नवीन बिल्डिंग बांधायला ठरवू ती आपणच बांधून घेऊ...

काही दिवसांनी बाबांचा फोन. कसे आहात आपण, त्या दिवसापासून तुमचा विचार मनात. काही विधी करावे लागतील ते सांगण्यासाठी येणार आहे तेव्हा भेटून बोलू या.अमुकतमुक तारखेला येत आहे.

त्या येण्याच्या तारखेआधी काही निनावी फोन. नंतर मित्र येऊन भेट. उगीचच चौकशी. मुख्य दरवाजासमोर मिरची लिंबू, काळी बाहुली कोणीतरी...

तो दिवस...
मित्र समोर...
बाबा येणार...
तुला भेटायला...
बाबा येतात...

बाबा काही सांगणार तेव्हढ्यात त्याने बोलण्यास सुरुवात केली. बाबा आपल्याविषयी खूप खूप आदर आहे. पण मी कोणतेही विधी करणार नाही. आणि जे काय प्रॉब्लेम येतील ते आमचे आम्ही सोडवू...

आणि ह आदरणीय बाबा...
ते येणारे ब्लँक कॉल बंद करायला सांगा...
ते लिंबू मिरची, काळी बाहुली वगैरे वगैरे...
नाहीतर...
मित्राकडे पाहतो...
सांग रे बाबांना...
तुला माहित आहे ना!
शांतपणे जगायचे ठरवले आहे...
शांतपणेच जगणार...
पण जसे तुम्ही बाबा म्हणून जगत आहात ना!
तसेच आम्ही पण शांतपणे...
समजले असेलच...
नाहीतर समजावून सांग रे...

**

## समता विद्यामंदिर पिशोर शाळेत दंतचिकित्सा शिबिराचे आयोजन




ज्योतिर्मय साहित्य

**पिशोर** – स्वच्छ मुख अभियान अंतर्गत शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजी नगर व जानकीदेवी बजाज ग्राम विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने समता प्राथमिक विद्यामंदिर पिशोर या शाळेत डॉ. सैफुद्दीन ग्रामीण रुग्णालय पिशोर व डॉ.सागर कुंभार शासकीय दंत विद्यालय संभाजीनगर तसेच डॉ.शेटे डॉ.कुंभार डॉ.पाटील डॉ. सावळे डॉ.शेट्टी मॅडम यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची दंतचिकित्सा करून त्वरित मोबाईल व्हॅन मध्ये मोफत उपचार केले व विद्यार्थ्यांचे मौखिक आरोग्यासाठी मार्गदर्शन केले प्रसंगी शाळेचे संचालक के.एस.कोल्हे, पी.एम.डहाके, यू.एल. नवले, तसेच मुख्याध्यापिका दिपाली घुगे, गणेश नवले, अमोल मोकासे अर्जुन गोमलाडू, स्नेहा मोकासे, सुनीता मोकासे, अर्चना मोकासे, शीला पल्हाळ, मनीषा देवरे, संजीवनी मोकासे, शीतल सावळे शारदा शिंदे, प्रशांत सपकाळ, वर्षा म्हैसमाळे, पूनम गोमलाडू, विमल गायकवाड, चेतन पाटील, संदीप मोकासे उपस्थित होते. शाळेच्या वतीने सर्व टीमचा सत्कार करण्यात आला.

## इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज संस्थेच्या मानद संचालकपदी डॉ. धारूरकर



**छत्रपती संभाजीनगर** – डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या विभागाचे माजी प्रमुख आणि माजी कुलगुरू डॉ. वि. ल. धारूरकर यांची पुणे येथील इन्स्टिट्यूट ऑफ नॉलेज या संस्थेच्या संशोधन व विकास विभागात मानद संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे डॉ. धारूरकर यांनी २०२३ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणावर एनईपी ट्रान्सफॉर्मर इंडिया हा विस्तृत ६५० पानाचा ग्रंथ लिहिला आहे.

महाराष्ट्रातील शाळा-महाविद्यालये व विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना एआय म्हणजे कृत्रिम प्रज्ञा तंत्राद्वारे गुणवत्ता संवर्धनासाठी सहाय्य करण्याचे काम ही संस्था करते. डॉ. धारूरकर यांचा विविध क्षेत्रातील शैक्षणिक अनुभव तसेच त्यांनी विविध माध्यम संस्थांना केलेले मार्गदर्शन तसेच त्यांच्या उच्च शिक्षणातील योगदान लक्षात घेऊन ही निवड करण्यात आली आहे.

संस्थेत रूजू झाल्यापासून डॉ. धारूरकर यांनी विविध ऑनलाइन कार्यशाळेत तीन-चार व्याख्याने देऊन महत्त्वपूर्ण लेखनही केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रातील दर्जा उंचाविण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा आहे. संस्थेचे संचालक डॉ. निलेश छडवेलकर यांनी पत्र लिहून डॉ. धारूरकर यांची नियुक्ती केली. त्यांच्या ज्ञान व अनुभवाचा तसेच कौशल्याचा शिक्षण क्षेत्रातील विविध पातळीवर गुणात्मक संवर्धनासाठी व नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विशेष योगदान लाभणार आहे. या नियुक्तीबद्दल चाहत्यांकडून डॉ. धारूरकर यांचे अभिनंदन होत आहे.




## कालवडी, मोकाट कुत्रे आणि श्री ची मिरवणूक

ज्योतिर्मय साहित्य

घटना सप्टेंबर १९९६ ची आहे. मी त्याकाळात संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर येथे कार्यरत होतो.

त्या काळात महिलांना ९०% अनुदानावर गाभण संकरित कालवडी चे वाटप कार्यक्रम होता. गाभण नव्वद कालवडी शासनाच्या दापचरी ता.पालघर येथिल पशु पैदास केंद्रातून तपासणी करुन निवड करायच्या होत्या. त्यासाठी मी व सहाय्यक म्हणून श्री.भाले व प्रमोद देशपांडे होते. तलासरी येथिल रेस्ट हाऊस वर तीन दिवस मुक्काम करुन पैदास केंद्रातून नव्वद कालवडींची निवड केली.

तालुका निहाय तिन ट्रक मध्ये लोड करुन संभाजीनगरला निघालो.

मी वैजापूर- गंगापूरच्या ट्रक मध्ये होतो. प्रथम वैजापूरला १२ कालवडी वाटपा साठी ठेवायच्या होत्या. रात्री बारा वाजता वैजापूर येथे पोहचलो. येथे डॉ.पैठणे व डॉ.शृंगारपुतळे पशुधन विकास अधिकारी होते.

डॉ.शृंगारपुतळे दवाखान्या च्या प्रांगनातील क्वार्टर मध्ये तर डॉ.पैठणे शहरात राहत होते.

**श्याम कुलकर्णी, पुणे**
**मो. ९८२३८ ०९६५६**

आमची ट्रक वैजापूर च्या दवाखान्यात प्रवेश करताच डॉ.शृंगारपुतळे मदत करायला आले. पण त्यंच्या हाताला प्लॅस्टर होते. पण त्या अवस्थेतही त्यानी मदत केली. त्यांचे कार्यालयाची खोली रिकामी करुन त्यात ८ कालवडी ठेवल्या पण त्यातील तीन कालवडी बाहेर

धावत गांवात गेल्या. या दिवसी श्री गणेश विसर्जनाची मिरवणूक होती..... मिरवणूकीत गर्दी व वाद्यांचा आवाजामुळे कालवडी अधिकच बिथरलेल्या व धावणाऱ्या कालवडीच्या मागे मोकाट कुत्रे व त्या मागे आम्ही धावत होतो. शेवटी मिरवणुकीतील व्यक्तींनी मदत केली व कालवडी परत दवाखान्यातील खोलीत डांबल्या. हा प्रकार रात्री सुमारे २ वाजे पर्यंत चालला होता.... व गंगापूर येथील कालवडी डॉ.पंतोजी यांच्या क्वार्टर मध्ये डांबण्यात आल्या तो पर्यंत दिवस उजाडला होता.

हाताच्या प्लॅस्टर अवस्थेत धावत मदत करणारे डॉ.सतीशराव शृंगारपूतळे व त्यांचे शिपाई कायम स्वरुपी माझ्या अंतर्मनात थिरावलेले आहेत.

# वारी चित्रपटाचा दिमाखदार मुहूर्त

ज्योतिर्मय साहित्य

पंढरीची वारी म्हणजे अवघ्या महाराष्ट्राचा आनंदोत्सव. वर्षभराची ऊर्जा देणारा आनंदसोहळा म्हणून पंढरीच्या वारीकडे पाहिलं जातं. महाराष्ट्राचे सांस्कृतिक अधिष्ठान असलेली ही पंढरपूरची 'वारी' आता मराठी चित्रपटरूपाने आपल्या भेटीला येणार असून नुकताच या चित्रपटाचा दिमाखदार मुहूर्त संपन्न झाला. मा. आमदार किसन कथोरे यांनी विधीवत पूजा करून या चित्रपटाला शुभाशिर्वाद दिले. अभिनेता प्रसाद ओक, वैभव मांगले, गणेश यादव, प्रणव रावराणे या दिग्गज कलाकारांच्या साथीने 'वारी' चा हा प्रवास आपल्याला घडणार आहे.




प्रवास ओढीचा, विठ्ठलाच्या गोडीचा! अशी भावना असणारी वारी प्रत्येकाला ओळखीची असली तरी दरवेळी तिचा नवा अनुभव आयुष्य समृद्ध करणारा असतो. पंढरपूरी विठूरायाला भेटण्याची तळमळ असतेच , पण त्यापेक्षाही पायी वारीतून वाटचाल करण्याचा आनंद आभाळाएवढा असतो. धन्यतेची अनुभूती देणारा हा प्रवास वारकरी भक्तांना 'आतून' श्रीमंत करतो, वारीची परंपरा मराठी मातीचं सांस्कृतिक वैभव वारी चित्रपटातून मांडण्यात येणार आहे.

वारीत अध्यात्म आहे, मॅनेजमेंट आहे, लोककला, संगीत, संस्कृती, मानवी भाव भावनांचा संगम सर्वच बघायला मिळतं. त्यामुळं वारीला शिक्षणाचं लोकपीठ का म्हटलं जातं हे वारीत आल्यानंतरच कळतं. 'कितीही लिहिलं तरी आणि वाचलं तरी वारी कळणार नाही..त्यासाठी वारीतच गेलं पाहिजे..आम्ही सुद्धा चित्रपटरुपी वारी तून हा प्रवास अनुभवणार आहोत, याचा आनंद कलाकारांनी याप्रसंगी व्यक्त केला'.

राज फिल्म्स अँड डिस्ट्रीब्युशन प्रस्तुत 'वारी' या चित्रपटाचे दिग्दर्शन नितीन कांबळे तर निर्मिती राजेश सावळाराम पाटील यांची आहे. चित्रपटाची कथा मनोज येरुणकर यांची असून पटकथा-संवाद मच्छिंद्र बुगडे यांचे आहेत. छायाचित्रण योगेश कोळी यांचे आहे. कार्यकारी निर्माता महेश चाबुकस्वार आहेत. 'वारी' चित्रपटाच्या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली आहे.

# राज्यांनी परस्परांच्या संस्कृती, परंपरांचा आदर केल्यास एकात्मता वाढेल-राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन




ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – देशातील लोकांमध्ये एकी नसल्यामुळे विदेशी शासकांनी आपल्यात फूट पाडून देशावर अनेक शतके राज्य केले. राज्यांनी परस्परांच्या संस्कृती परंपरांचा आदर केल्यास लोकांमधील एकात्मता वाढेल व सर्वांनी एकदिलाने राष्ट्रासाठी योगदान दिल्यास 'एक भारत श्रेष्ठ भारत' निर्मितीचे स्वप्न साकार होईल, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली राजस्थान आणि ओडिशा या दोन राज्यांचा राज्य स्थापना दिवस महाराष्ट्र राजभवन मुंबई येथे संयुक्तपणे साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमात सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी लोकनृत्य व लोकगीतांच्या माध्यमातून राजस्थान व ओडिशा राज्यांच्या संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविल्याबद्दल राज्यपालांनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली. केंद्र सरकारच्या 'एक भारत, श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत राजभवनातर्फे या राज्य स्थापना दिवसाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला माजी खासदार रामशेठ ठाकूर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रोव्होस्ट चंद्रकांत दळवी, कुलगुरु डॉ. ज्ञानदेव म्हस्के, राज्यपालांचे उपसचिव एस राममूर्ती तसेच विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अवघ्या काही हजार ब्रिटिशांनी देशातील लोकांमध्ये फूट पाडून करोडोंची लोकसंख्या असलेल्या आपल्या देशावर अनेक दशके राज्य केले. आगामी काळात प्रगतीची शिखरे सर करण्यासाठी देशात एकात्मता टिकून राहणे आवश्यक असून एकतेमुळे देशाचे जगातील स्थान उंचावले असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

राजस्थान व ओडिशा राज्यांचे देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात देखील महत्वाचे योगदान आहे. ओडिशाचे सुपुत्र शेलेंद्र यांनी इंडोनेशियातील जावा, सुमात्रा इथपर्यंत राज्यविस्तार केला होता. ओडिशात जन्मलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्यासाठी दिलेले योगदान अनन्यसाधारण होते असे सांगून एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमामुळे देशातील लोकांना इतर राज्यातील महान नेत्यांचे योगदान समजण्यास मदत होत आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

याप्रसंगी दोन्ही राज्यांचा इतिहास, सौंदर्य, वारसा, कला संस्कृती आणि पर्यटन स्थळे दर्शविणारे लघुपट दाखवण्यात आले. यावेळी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राजस्थानी लोकगीते केसरिया आणि झिरमीर बरसे आणि लोकनृत्य चिरामी, घूमर आणि कालबेलिया सादर केले. राजस्थानी राज्यगीत 'पधारो म्हारो देस' ने उपस्थितांची माने जिंकली.

तसेच, ओडिशातील लोकगीते संबलपुरी गीत- 'रसरकेली बो' आणि लोकनृत्य संभलपुरी ढलकाई सादर करण्यात आले.

राज्यपालांच्या हस्ते यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रोव्होस्ट चंद्रकांत दळवी तसेच विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी स्वागतपर भाषण केले तर अवर सचिव (शिक्षण) विकास कुलकर्णी यांनी आभार मानले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559